साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
कार्यालय : शॉप नं. ७४,७५ रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर-१८
E-mail : dsahasikngp@gmail.com
श्री. अकील अहमद उर्फ गुड्डूभाई
कार्यकारी संपादक
मो.नं. ९८२२०९४०१४

दैनिक
# साहसिक
epaper
www.sahsik.com
सजग समाजाचा दक्ष प्रहरी

**किरायाने देणे आहे**
१) २ हजार ५०० स्के. फुट पक्के बांधकाम असलेले मकान ऑफिस करीता किरायाने देणे आहे.
२) तसेच २१०० स्के. फुट प्लॉट एन.ए.टी.पी. झालेला पद्मावती नगर, आलोडी, ता.जि.वर्धा हा विकणे आहे.
करीता खालील पत्यावर संपर्क करा.
मो.क्र. ८८७९७९५७६८

वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १२ अंक : १७० शनिवार ५ जानेवारी २०१९ मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार (पाटील) (पृष्ठ -८) मूल्य : ३ रुपये

**सुविचार**

आपले लक्ष्य, साध्य विसरू नका. अन्यथा जे काही मिळाले तेवढ्यावरच संतुष्ट राहण्याची सवय लागेल.

**चारोळी**

आई सर्वांनाच हवी
असते आपली हाक
ऐकण्यासाठी
हवे तेव्हा आपल्यासाठी
आपले म्हणून
राहण्यासाठी .

**हसा जरा जपून..**

न्यूटनचा मृत्यू कसा झाला???
त्याने रजनीकांतचे पिक्चर बघितले आणि आपण स्वत: तयार केलेल्या नियमांची वाट लागताना बघून त्याला धक्का बसला.

# मनोरुग्ण वकील चंद्रशेखर शिंदेला अटक करून वेड्याच्या इस्पितळात रवानगी करण्याची नागरिकांची मागणी



**अँड. विवेक रामटेके**
अध्यक्ष-डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान बचाव वकील परिषद

* ॲट्रासिटी कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद करण्यासाठी तक्रार दाखल.
* वकील संघाच्या अध्यक्षांवर न्यायालयात हल्ला केल्यामुळे बार कौन्सिल तर्फे कार्यवाही होण्याच्या भीतीने शिंदेने बार कौन्सिलचे अँड. आशिष देशमुख सह विविध मान्यवरांविरुद्ध दाखल केली तक्रार
* शासनाने नोंदणी प्रमाणपत्र दिलेल्या संघटनेला बेकायदेशीर सांगून तक्रार दाखल करणाऱ्या शिंदेला अटक करण्याची मागणी
* अनुसूचित जातीचे नेत्याविरुद्ध खोटी तक्रार दिल्यामुळे चंद्रशेखर शिंदे विरुद्ध ॲट्रासिटी कायद्याअंतर्गत कारवाई करण्याची इंडियन बार असोसिएशनची मागणी
* शिंदेला मानव अधिकारांच्या जनता दरबारात येऊ न दिल्यामुळे चिडून जाऊन मानसिक विकृतीचे प्रदर्शन करीत त्याने आयोजक, प्रमुख अतिथी असलेले काँग्रेसचे खासदार राजीव सातव, माजी आमदार विजय खडसे, भाजपाचे नितीन भुतडा, महेश मिश्रा, तसेच सामाजिक कार्यकर्ते मुरसलीन शेख, प्रकाश आर्य, रशीद खान पठाण, सर्व उपस्थित पत्रकार आदीं विरुद्ध कारवाईसाठी अर्ज दिला असून त्याची तक्रारच खोटी निघाल्याने आता त्यांच्या विरोधात कारवाईसाठी सर्व नागरिक एकवटले असून शिंदेला लवकरच अटक होण्याची शक्यता
* याआधी सुद्धा शिंदेने असे अनेक विक्षिप्त प्रकार केल्याचे उघड



**रशीद खान पठान**
राष्ट्रीय सचिव
मानवाधिकार सुरक्षा परिषद

*प्रतिनिधी/ ४ जानेवारी*

**उमरखेड :** पुसद येथील मनोरुग्ण वकील चंद्रशेखर शिंदे यांना चोरी, जातीयवादी मानसिकता व इतर गंभीर आरोपांमुळे मानव अधिकार सुरक्षा परिषद संघटनेमधून बऱ्याच वर्षाआधी हकालपट्टी करण्यात आल्यानंतर त्याने विविध लोकांना खोट्या तक्रारी देऊन दबावतंत्राचा अवलंब करून खंडणी वसुलीचा प्रयत्न केला परंतु तो यशस्वी झाला नाही. नुकतेच त्याने पुसद वकील संघाचे अध्यक्षांवर न्यायालय आवारात हल्ला केला त्यामुळे त्याची चौकशी होऊन सनद रद्द होण्याची कारवाई होणार या भीतीने त्याने बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्राचे माननीय अध्यक्ष अँड. आशिष देशमुख, काँग्रेसचे खासदार आदीसह विविध मान्यवरा विरुद्ध खोटी तक्रार दाखल केली आणि त्या तक्रारीचा खोटेपणा सिद्ध झाल्याने व त्याच्या विक्षिप्त सवयीमुळे नागरिक, वकील आणि पोलिस यंत्रणा त्रस्त झाल्यामुळे आरोपी चंद्रशेखर शिंदेला अटक करून त्याची रवानगी वेड्यांच्या इस्पितळात करावी अशी मागणी इंडियन बार असोसिएशनचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान बचाव वकील परिषदेचे अध्यक्ष अँड. विवेक रामटेके यांनी केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मानव अधिकार सुरक्षा परिषद ही संस्था २१ सप्टेंबर २००८ रोजी धर्मादाय आयुक्त नागपूर येथे नोंदणी करण्यात आली व त्याच नावाने काम करण्याकरीता शासनाने रीतसर परवानगी दिली. त्यानंतर संघटनेने विविध सामाजिक कार्य करून नागरिकांना न्याय मिळवून दिला. त्यांच्या कार्याची प्रशंसा राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष माननीय न्यायमूर्ती क्षितीज व्यास, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती के. जी.बालकृष्णन, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, माजी कायदामंत्री सलमान खुर्शीद, माजी गृहमंत्री पी.चिदंबरम आदी मान्यवरांनी केली व त्यांचे प्रशंसापत्र संघटनेच्या विविध पुस्तकांमध्ये प्रकाशित करण्यात आले. नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी पोलीस नागरिक व मानवाधिकार कायदा हे पुस्तक प्रकाशित केले.

संघटनेने भ्रष्ट व अकार्यक्षम अधिकाऱ्यांमध्ये दरारा करून यवतमाळचे तत्कालीन जिल्हा पोलीस

(उर्वरित पान २ वर)

## मारवाडी एकेकाळी गरिबांची पिळवणूक करणारा समाज : सुशीलकुमार शिंदे



*प्रतिनिधी/ ४ जानेवारी*

**नागपूर :** मारवाडी समाजाबद्दल काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केलेले वक्तव्य एका नव्या वादाला तोंड फोडू शकते. मारवाडी समाज एकेकाळी गरिबांची पिळवणूक करणारा समाज म्हणून ओळखला जायचा, असे वक्तव्य सुशीलकुमार शिंदे यांनी केले आहे. नागपुरात मारवाडी फाऊंडेशनद्वारे दिल्या जार्णाय़ा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते.

मारवाडी समाज एक लोटा आणि एक पंचा घेऊन मारवाड मधून आला. मात्र मेहनत व नशिबाच्या जोरावर त्यांनी पैसा कमावला आणि

(उर्वरित पान २ वर)

## कमिशन मिळालं नाही म्हणून काँग्रेसने राफेलचं डील केलं नाही : निर्मला सीतारमन



*वृत्तसंस्था/ ४ जानेवारी*

**नवी दिल्ली :** कमिशन मिळालं नाही म्हणून काँग्रेसने राफेलचं डील केलं नाही असा आरोप संरक्षण मंत्री निर्मला सीतारमन यांनी शुक्रवारी लोकसभेमध्ये राफेल मुद्यावर बोलताना केला. राफेलच्या निर्मितीचे कंत्राट एचएएला का दिले नाही ? अनिल अंबानीच्या कंपनीची निवड का केली ? असा प्रश्न वारंवार काँग्रेसकडून उपस्थित केला जातो. त्यावर निर्मला सीतारमन यांनी व्हीव्हीआयपी हेलिकॉप्टरचे कंत्राट तुम्ही एचएएलला का दिले नाही ? असा प्रतिप्रश्न केला. एचएएलकडून तुम्हाला काही मिळणार नाही हे माहित होतं. ते ऑगस्टा वेस्टलँडकडून मिळालं म्हणून तुम्ही एचएएलऐवजी ऑगस्टा वेस्टलँडची निवड केली असे सीतारमन म्हणाल्या.

सीतारमन यांनी आम्ही डीफेन्स डील करतो. डीफेन्समध्ये डीलिंग करत नाही असं सांगत भाजपाचे सरकार कमिशन घेत नसल्याचे तर काँग्रेसचे सरकार कमिशन घेऊन काम करत असल्याचा आरोप केला. त्यामुळे काँग्रेस सरकारला राफेल करार करण्यात रसच नव्हता असा दावाही त्यांनी केला.

राष्ट्रीय सुरक्षेला आमचे पहिले प्राधान्य आहे. कोणीही सत्तेमध्ये असो राष्ट्रीय सुरक्षा आमच्यासाठी महत्वाची आहे. आम्ही सत्यापासून पळणार नाही

(उर्वरित पान २ वर)





